# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Illegal Gutkha**

**Police Station** :- **SP Office And LCB, Washim**

**Date of Good Work done** :- **23/01/2022**

**Brief of the work done :-**

**पोलीस अधीक्षक श्री. @IPS_Bachchan यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रिसोड येथे 1.5 कोटी रुपयांचा गुटखा जप्त केला असून दोन इसमांना ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.** रिसोडात गुटख्याची सर्वात मोठी कारवाई, तब्बल दीड कोटींचा गुटखा जप्त. वाशिम पोलीस दलाची धडाकेबाज कारवाई.






# रिसोडात दिड कोटीचा गुटखा जप्त

## दोन आरोपींना अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन...

**रिसोड** ■शहरातील जुनी सराफा लाईन भागातील एका जुन्या घरातून तब्बल दीड कोटी रूपयांचा विविध कंपनीचा गुटखा जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर कारवाई वाशिम येथील स्थानिक गुन्हे शाखाच्या पोलिस अधिकाऱ्यांनी आज २३ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास केली. सदर घटनेमुळे रिसोड शहर अवैध गुटखा विक्रीचे केंद्र बनत असल्याचे बोलले जात आहे.

शहरातील वाढते अवैध धंदे व अवैध गुटका विक्री या संबंधित पोलिस प्रशासनाकडे तक्रारी वाढल्या होत्या.या तक्रारी लक्षात घेता वाशीम स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस अधीक्षक जाधव यांनी वाशिम जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनात आज दिनांक २३ जानेवारी रोजी दुपारी रिसोड शहरातील जुनी सराफा लाईन भागातील धोबी गल्ली परिसरातील एका जुन्या घरात छापेमारी करून तब्बल दीड कोटी रुपये पेक्षा जास्त प्रतिबंधित विविध कंपनीचा गुटका जप्त केला.या संबंधित जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी दुपारी चार वाजता रिसोड पोलीस स्टेशन मध्ये पत्रकार परिषद घेऊन ही माहिती दिली. बच्चन सिंह यांनी पत्रकारांना सांगितले की त्यांना एक गोपनीय माहितीच्या आधारे असे कळाले होते की रिसोड शहरातल्या धोबी गल्ली परिसरात मोठ्याप्रमाणात प्रतिबंधित गुटख्याची साठवण केलेली आहे. त्या आधारे बच्चन सिंह यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या चमूला संबंधित जागेवर छापेमारी करण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सदरील छापेमारी केल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांनी स्वतः घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. गुटका हा धोबी गल्लीतील एका जुन्या घरातील तीन खोल्यांमध्ये साठवण करून ठेवलेला होता.जप्तीची कारवाईनंतर पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. सदरील गुटखा संबंधित सर्व धागे-दोरे गोळा करण्याचे काम पोलिसांची एक टीम करणार असून सदर माल कोठून आला, याचा खरा मालक कोण आहे. हा माल किती ठिकाणी पोचविण्यात येणार होता. याबाबत सखोल चौकशी करणार असल्याचे बच्चनसिंह यांनी यावेळी पत्रकार परिषदेत सांगितले. गुटका कुठून आला व केव्हा आला या सर्व बाबी वर तपास केला जाईल असेही बच्चन यांनी सांगितले. पत्रकार परिषदेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधीक्षक सोमनाथ जाधव हे उपस्थित होते. रिसोड शहरात गुटका जप्तीची सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे.(ता.प्र.)

### रिसोड अवैध धंद्याचे मुख्य केंद्र

रिसोड शहर हे मराठवाड्याच्या सिमेवर आहे. त्यामुळे मराठवाड्यातून विविध कंपनीचा गुटखा, गांज्या असे अंमली पदार्थांची तष्करी विदर्भात केली जात असल्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी जवळपास तीन कोटी रूपयांचा गांजा पोलिसांनी जप्त केला होता. त्यामुळे रिसोड हे अवैध व्यवसायाचे केंद्र बनत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. रिसोड सारख्या शहरात ऐव्हढ्या मोठ्या प्रमाणत अवैध मालाची तष्करी, शहरासह ग्रामिण भागात फोफावलेले अवैध धंदे स्थानिक पोलिस प्रशासनाच्या नजरेतून सोटतातच कसे, याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे.